# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

दुरध्वनी क्र ०२०-२६२०८३५६ फॅक्स क्र ०२०-२६१२८१०५ ई-मेल estt3.pco.pune@nic.in


क्र.आस्था-३(१)/पो.भ.-२०१९/अनाथ-वयोमर्यादा-परीक्षा शुल्क/२०१९
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक ७/९/२०१९

संदर्भ – १.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दि.३/९/२०१९ रोजीचे परिपत्रक

२.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्रमांक-प्रशि/पो.शि.भरती/सन-२०१९/७०२/२०१९/१०७३, दि.४/९/२०१९ रोजीचे पत्र.

विषय- पोलीस शिपाई भरती-२०१९

**अनाथ उमेदवारांचे वयोमर्यादा व परीक्षा शुल्कबाबत..**

--o--

## शुध्दीपत्रक

उपरोक्त विषयास अनुसरुन अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दि.३/९/२०१९ रोजीचे परिपत्रकास अनुसरुन कळविण्यात येते की, शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.२/४/२०१८ मधील तरतुदींनुसार अनाथ मुलांना देण्यात आलेले समांतर आरक्षण फक्त खुल्या प्रवर्गातून देण्यात आलेले असले तरी, शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२०/८/२०१९ नुसार अनाथ मुलांना मागासवर्गीयांप्रमाणे वय व फि यामध्ये सवलत देणे आवश्यक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

**"जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत अनाथ मुलांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे राहील. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी लागू असलेले परीक्षा शुल्क रुपये ३५०/- अनाथ मुलांना लागू राहील. "**

(डॉ.संजय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
पुणे शहर

प्रति,

पोलीस निरीक्षक, संगणक विभाग, पुणे शहर.

E:\POLICE BHARTI ALL FOLDERS\POLICE BHARTI-2019\NOTTING-PB-19 - II.DOCX